**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004 महाराष्ट्र
PHONE : EPABX : 2609000
FAX No : 0091 – 0231 – 2690655, 2692333, 2691533
ए.आर. परीक्षा विभाग 2609486

जा. क्र/शिवाजी वि./परीक्षा/डी. वाय. आर. ऑन/3312 दि. 21/10/2015

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक

संलग्नित महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्था

विषय – 1) अंतर्गत/टर्मवर्क/प्रॅक्टीकल/गुणांची डाटा एंट्रीसाठी प्रणाली उपलब्ध करुन देणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, ऑक्टो. 2015 मध्ये होणा–या भाग 1 सत्र चे परीक्षांचे संपूर्ण कामकाज विद्यापीठ पोर्टलवर होणार आहेत व भाग 2/3 सेमि 1/2 रिपीटर व सेमि 3/4/5/6 निकालासह सर्व कामकाज डियु पोर्टलवरुन होणार आहे. या अनुषंगांने खालील बाबींचे काटेकोर पणे पालन करणे आवश्यक आहे.

**अ) अंतर्गत/सत्रकर्म(टर्मवर्क) गुणांची डाटा एंट्री :**

१. ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत/सत्रकर्म(टर्मवर्क)/प्रात्यक्षिक गुण आहेत अशा परीक्षांचे अंतर्गत/टर्मवर्क/प्रक्टिकल गुण भरण्यासाठी डियु पोर्टलवर प्रणालीद्वारे सुविधा करुन देण्यात आली आहे. डियु पोर्टलवर प्रणालीद्वारे हे गुण भरणे आवश्यक आहे. दुरशिक्षण प्रणाली मधील विद्यार्थ्यांचे सदरचे गुण संबधित अभ्यासकेंद्रांनी (स्टडी सेंटर्स) भरावयाचे आहेत.

२. सदर प्रणाली 28 ऑक्टो. 2015 पासून ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येईल महाविद्यालयातील संबधितानी अंतर्गत/टर्मवर्क/प्रॅक्टीकल चे गुण ऑनलाईन पध्द्तीने 10 नोव्हेंबर 2015 अखेर बिनचूकतेने भरणेचे असून त्याची छापील प्रत संबंधीत विषय शिक्षक/परीक्षक यांच्या सहीने प्रमाणित करुन त्या त्या परीक्षा विभागात दि. 15 नोव्हेंबर 2015 पुर्वी किंवा पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. गुण ऑन लाईनच भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सी. डी. पाठवू नयेत. दुरशिक्षण प्रणालीच्या विद्यार्थ्यांबाबत सदरची प्रत दुरशिक्षण केंद्राच्या संबंधित समन्वयकांकडे जमा करावयाची आहेत.

३. निर्धारित तारखेनंतर आलेले गुण कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. अशा सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात. गुण भरण्याची ऑनलाईन सुविधा निर्धारित तारखेस बंद झाल्यानंतर ती पुन:श्च उपलब्ध करुन देण्यात येणार नाही. याबाबत सूचना संबधितांना द्याव्यात.

कृपया वरील माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करवून घ्यावी व परीक्षा आणि निकालाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/—

(श्री. महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

प्रत :—

1 संचालक/उपकुलसचिव दुरशिक्षणकेंद्र

2 सर्व विभाग प्रमुख व उपकुलसचिव/सहा. कुलसचिव.